महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२१-२२/२०२२/ 200 दिनांक 12 JAN 2022

**महत्वाचे परिपत्रक (गुणवत्ता यादी तपासणी)**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/
व्यवस्थापनशास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्याची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...**

**संदर्भ : १) महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दिनांक १७/०८/२०१५**
**२) मा.सचिव , प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण /२२२२/प्र.क्र.०१/प्रनिप्रा/०४ दिनांक ०४/०१/२०२२**
**३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.२ अ/एडीएम/२०२२/१२ दि. ११.०१.२०२२.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील संचालनायांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया पूर्ण झालेली आहे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी करण्याकरीता मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये या सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना प्राधिकृत केले आहे.

कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या जिल्ह्यांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील **पदवी व पदव्युत्तर पदवी** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र इत्यादी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी संबंधित जिल्ह्यातील सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये दि. १७-०१-२०२२ ते दि. २१-०१-२०२२ पर्यंत करावयाची आहे.

सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीमधील आपल्या संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या तपासणी केंद्राने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश प्रक्रियेसंदर्भात काम करणारे अधिकारी व कर्मचा-यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे. सदर तपासणीसाठी उमेदवारांची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसोबत Receipt cum Acknowledgment of Confirmation of Admission (Institute Reporting) ची प्रिंट घेऊन जावे. तसेच प्रवेश यादी पडताळणीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची प्रिंट १ प्रतीत (प्राचार्यांचे नाव/सही शिक्क्यासह) घेऊन जावे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्विकारली जाणार नाही.

तरी सर्व संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या तपासणी केंद्रांकडून आपली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व त्यांची मूळ कागदपत्रे तपासून घेतल्यानंतर या विभागीय कार्यालयाकडून पुढील पडताळणी व तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता सोबत जोडलेल्या चेकलिस्टनुसार कागदपत्रांसह दिनांक २१-०१-२०२२ ते ३१.०१.२०२२ पर्यंत या विभागीय कार्यालयाकडे संपर्क साधावा. या तपासणी करीताचे वेळापत्रक या कार्यालयाकडून प्रदर्शित करणेत येईल. पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या संचालनायास या विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात येतील.

प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी सादर करणेसाठी संस्थेने वर निर्धारीत केलेल्या दिनांकापर्यंत प्रवेश यादी सादर करणे आवश्यक आहे.

**प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत विहीत कालमर्यादेत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संस्थाप्रमुख जबाबदार राहतील.**

(डॉ.द.गं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी (कार्यासन क्र. २ अ)



..MERIT LIST\Merit list letter and cirucular.docx